मद्रास महिला परिषदची हाक–

# स्त्री जीवनाची सर्वांगीण कोंडी फोडा

तारा वळंजु

दिनांक १०-११-१२ मार्च रोजी मद्रास येथे भरलेल्या अखिल भारतीय लोकशाही महिला असोसिएशनचे पहिले अधिवेशन भारतीय महिलांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नमूद होईल असे स्फूर्तिदायक उद्‌गार वीणा मुजुमदार यांनी आपल्या उद्‌घाटनाच्या भाषणात काढले. ते किती यथार्थ आहेत हे देशाच्या कोना-कोपऱ्यातून आलेल्या प्रतिनिधी संख्येवरून व परिषदेत झालेली भाषणे व ठरावावरून स्पष्ट होणार आहे.

या परिषदेला नैऋत्य-ईशान्य सीमेपासून ते कन्या-कुमारीपर्यंत अनेक राज्यांच्या महिला प्रतिनिधी आल्या होत्या. अखिल भारतीय या शब्दाचे खरे सौंदर्य त्यातील अनेक रंगरूपे, भाषा, वेशभूषा यांची विविधता तरीही त्यातील अविभाज्य एकात्मता यांचे विलोभनीय व अविस्मरणीय दर्शन या परिषदेत पदोपदी घडत होते. आसामच्या मटक टोळीतील सुशीला, त्रिपुरातील आदिवासी पुढारी मंगलेश्वरी, बंगालच्या तुरुंगात जन्म ठेपेची शिक्षा सात वर्षे भोगलेली व आता सुटून आलेली भारती तरफदार, तामीळनाडूची जुनी लढाऊ स्त्री जानकी अम्मा, तेलंगणच्या लढ्यात प्रत्यक्ष भाग घेतलेली सुषमा स्वराज्यम, आंध्रची लढाऊ उदयत, महाराष्ट्रातील वारली जमातीची हेमलता कोम, मुंबईच्या झुंजार नेत्या अहिल्या रांगणेकर येथपासून तो सुभाषचंद्र बोस यांच्या स्त्री फलटणीची कॅप्टन लक्ष्मी सेगल इत्यादि शेकडो महिला म्हणजे भारताच्या लढाऊ परंपरेचा तीन पिढ्यांचा हा त्रिवेणी संगम होता.

आलेल्या प्रत्येक महिलेला स्वतःच्या अनुभवातून आलेल्या महिला जीवनातील दुःखे, जाच, अवहेलना, पिळणूक, दास्य, विटंबना किती आणि कसे वेशीवर टांगू असे झाले होते. या महिला व्यासपीठावर येऊन बोलत नव्हत्या तर आग पाखडीत होत्या. एक ठिणगी-सुद्धा वडवानल पेटवू शकते पण इथे तर भारतीय स्त्रीच्या मनात धुमसत असलेल्या प्रक्षोभावर शेकडो ठिणग्या पडत होत्या. प्रत्येक कार्यकर्ती स्वतःच्या मातृभाषेत बोलत होती. इंग्रजीत भाषांतर होत होते. त्यामुळे बोलण्याचा आशय सर्वांना कळत होता. परिणामी हुंदके, राग, टाळ्या, शेमशेम, निर्भत्सना, मनस्वी चीड व पुढे जाण्याची जिद्द यांनी सभागृह दुमदुमत होते. पण तरीही सर्वांना कॉमन अशी राष्ट्रभाषा असावी याची जाणीव तीव्रतेने होत होती.

परिषदेचे उद्‌घाटन वीणा मुजुमदार 'चेअरमन वुईमेन्स स्टेटस् कमिटी ऑफ इंडिया' यांनी केले. त्या म्हणाल्या, 'मागासलेल्या देशातील स्त्रियांपासून युरोप अमेरिकेतील पुढारलेल्या देशांतील स्त्रियांपर्यंत सर्व स्त्रिया नव्या जाणिवेने जगभर आपल्या हक्कांसाठी उठत आहेत. आपला लढा हा जागतिक महिला लढ्याचा भाग आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतीक हक्कांना वंचित झालेली जात म्हणजे स्त्री जात. स्त्रियांची मृत्युसंख्या जास्त. बालमृत्यूचे प्रमाण महाभयंकर. स्त्रियांना कामधंदा नाही. शेतमजूर स्त्रिया शेतात तण काढण्याचे काम करीत, तणनाशक औषधे वापरून या स्त्रियांना बेकार करण्यात आले. जमीन वाटप करताना विधवा स्त्रीला जमीन मिळत नाही. जंगल संपत्ती स्त्रिया गोळा करीत असत तर जंगले तोडून तेथे मक्तेदारीने निलगिरीची झाडे लावण्यात येत आहेत. अशी अनेक उदाहरणे आकडेवारीने देऊन स्त्रीजीवनाची भयानक वास्तवता त्यांनी उघड केली व शेवटी या अर्ध्या मानवतेला ज्यात स्थान नाही त्याला प्लॅनिंग म्हणायचेच का असा मूलभूत मुद्दा उपस्थित केला. कोणत्याही महिला संस्थांनी हा मुद्दा उपस्थित केला नाही हे त्यांनी निदर्शनास आणले.

परिषदेत महागाईविरोधी, नागरिक स्वातंत्र्याचा पुरस्कार सामाजिक अन्याय व कायदेशीर समानता, माता व मुले यांचा सांभाळ, बालमजुरी, कर्मचारी स्त्रियांच्या मागण्या, बेकारी, शिक्षण, जातियता विरोध अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री हुतात्म्यांना वंदन, वेश्याव्यवसाय व देवदासीप्रथा, आठ मार्च महिला दिनानिमित्त जागतिक महिला चळवळीशी भ्रातृभावाचेच संबंध, स्त्रीचे सांस्कृतिक अवमूल्यन, महिलासाठी खेडचापाडचातून आवश्यक प्राथमिक गोष्टी इतर महिला संघटनांना शुभसंदेश इत्यादि ठराव झाले.

भाषणातील काही क्षणचित्रे ठळक लक्षात रहाण्यासारखी आहेत. तामीळनाडूच्या लक्ष्मी अम्माने आपल्या मुलीला कसे जाळण्यात आले त्याचे केलेले हृदयद्रावक वर्णन, त्रिपुरातील मंगलेश्वरीदेवीने आदिवासीवर होणारे अत्याचार, आंध्रच्या स्वराज्यमते आंध्रमधील होणाऱ्या मुलींची विक्री इत्यादी वर्णन ऐकून स्त्रिया गहिवरून आल्या. देवदासीच्या ठरावावर बोलताना इंदिरागांधींना असा इशारा देण्यात आला की या सर्व गोष्टी इंदिरागांधींना दिसत नसल्या तर आम्हाला त्या दाखविण्यासाठी शॉक ट्रीटमेन्ट द्यावी लागेल.

या परिषदेचे दुसरे वैशिष्ठ्य म्हणजे अगदी साधेपणा, छान छोकीचे नाव नव्हते, केळीच्या पानावरचे साधे जेवण. सांस्कृतीक कार्यक्रमात टागोर, सानेगुरुजी त्याचप्रमाणे इतर प्रातांतील राष्ट्रीय कवींच्या गीतांच्या संकलनाचे दर्शन घडविणारा सुरेख कार्यक्रम करमणूकीचा कार्यक्रम म्हणून झाला.

( पान १३ वरून पुढे चालू )

तेव्हा माझा संसार सुटसुटीत आहे. एक मुलगा नि एक मुलगी. मुलीला बी. ए. केलंय. पण अजून लग्न झालं नाही, लग्न जमताना शिक्षण आड येतंय. मुलगा नोकरी धंद्याला आहे. सगळं अलबेल आहे...

...समाजासाठी खूप काम करावंसं वाटतं. आम्हालाही चांगलं रहावं, मुलांना खूप शिकवावं असं वाटतं पण पैशापाई अडतं. बाबासाहेबांच्या प्रयत्नानं आम्हाला थोडं पुढं यायची संधी मिळतेय पण ते बघवत नाही लोकांना. तेव्हा फार संताप येतो. रक्त गरम होतं. पण काय करावं समजत नाही. कोणा मागून जावं समजत नाही.

मी फक्त बायाबायांमध्ये जुन्या भोळ्या समजुती यांनी टाकाव्यात असं सांगत हिंडते. तसं तर पार ५६ पासून हेच काम करत आलेय. हिंदूंच्या देवांनी काय दिलं आम्हाला ? काही नाही. बकरं कोंबडं कापकापून पदरात काहीसुद्धा पडलं नाही. उलट खालीच बघायला लावलं. आमच्या वाट्याला आलेले देवसुद्धा कसे ओबडधोबड. त्यांना ना रंग ना रुप. त्यांची कसली पूजा करायची ?

खरं तर माझ्या घराच्या भिंती देवाच्या चित्रांनी भरल्या होत्या. पण ५६ साली बाबांनी बौद्ध धर्माची दिक्षा दिली. तेव्हा मन घट्ट झालं होतं. हिंदु धर्मानं आपल्याला काही दिलं नाही, आपलं भलं केलं नाही असं मनोमन पटलं होतं. आळीतल्या बायांना बौद्ध धर्म घेण्याचं सांगायला लागले तशी त्या म्हणाल्या की आधी तुझ्या घरातली चित्रं काढ. मग आम्हाला सांग. मी खुशाल सगळी चित्रं बोहारणीला विकून टाकली.

मग मुलाचं लग्न निघालं. तेव्हा नेहमीच्या रिवाजानं बोकड कापायचं ठरलं. मी म्हणाले नाही— बोकड अजिबात कापायचा नाही. बोकड न कापता साधेपणानेच लग्न करा.

वर्षभरानं सुनेला दिवस राह्यले. सुन बाळंत झाली. पण मुल मेलेलंच होतं. सारे म्हणाले बघा— देवीला निवद केला नाही म्हणून असं झालं.

मी मनातल्या मनात जरा चमकले. म्हटलं खरंच का ? खरंच देवी रागावली का ? खरंच देवी आहे का?

पण दुसरं मन सारखं मागं लागलं की एखाद्या डॉक्टरकडे जा. मग डॉक्टरकडे गेले. हे असं का झालं ते समजावून घेतलं. पुढल्या वेळी त्यांनी सांगितली तशी काळजी घेतली. आता सुनेला दोन मुलं आहेत.

या भोळ्या समजुती फार आड येतात. मी वस्ती—वस्तीतून जाऊन बायांना समजावते. पण मी एकटी कुठवर जाणार ? दलित स्त्रीवरच्या अत्याचारानं कानशीलं तापतात. स्वतः इंदिरागांधींना दाद मागायला जावंसं वाटतं. पण कसं जावं ? काय करावं ? बाबाचं बोलणं मनावर ठसवून, पोटाला चिमटा घेऊन ज्यांना शिकवलं ती पोरं बी. ए. एम. ए. झाली तरी त्यांना नोकऱ्या भेटत नाही. सवलत असूनही बेकारी टळत नाही. असं का ? हे समजत नाही. कोणाचं ऐकावं ? कोण्यामागून जावं ? माझ्यासारख्या म्हातारीचं रक्तही उसळतं. पण रस्ता दिसत नाही. बाबा गेले अन सारा अंधार झाला.